| MHKO140005882026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७९/२०२६**<br><br>लक्ष्मण गोविंद कलागते<br>**वि.**<br>महाराष्ट्र शासन तर्फे, पोलिस निरीक्षक, चंदगड पोलिस ठाणे, चंदगड ता. चंदगड, जि. कोल्हापूर |
|---|---|

**निशाणी क्र.१ खालील आदेश**
**(दिनांक– ०३/०७/२०२६)**

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा सहिंता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार यांना बॅक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडून Whats App ग्रुपवर एक लिंक आली. यातील अर्जदार यांनी सदर लिंकवर क्लीक केलेनेतर अर्जदार यांचे खातेतील रक्कम रु.१,२२,०००/– रक्कम अर्जदारचे परवानगीशिवाय काढणे आले असुन अर्जदार यांची फसवणुकीझालेबाबत चंदगड पोलिस ठाणे येथे तक्रार केलेली आहे. पोलिस ठाणे यांचे सांगण्याप्रमाणे त्यांनी सायबर क्राईम पोर्टल येथे अॅकनॉलेजमेंट नं.२१९०५२५००५८५१९, दिनांक २१/०५/२०२५ रोजी तक्रार नोंदविलेली आहे. अर्जदार यांची एकूण रक्कम रु.१,२२,०००/– ची फसवणुक झालेली आहे आणि त्यापैकी युको बॅक खाते नं.३३६२०११००४४५३७ वर रु.४५००/–, फिनो पेमेंटस् बॅक खाते नं.२०३१३२८६६९८, रु.८७.७४/–, पंजाब नॅशनल बॅक, खाते नं.१३९७२००१०००१४५६५ रक्कम रु.१७.००/–, बंधन बॅक, रक्कम रु.४३,६३४.००/– खाते नं.२०२०००९६९९३८३० अशी एकूण रक्कम रु.४८,२३८.७४/– सायबर शाखेच्या अधिकारी यांनी गोठवलेली आहे. सबब. सदर रक्कम ही चंदगड पोलिस ठाणे मार्फत सायबर गुन्हे शाखा, कोल्हापूर यांनी गुन्हयाच्या कामी जप्त केलेली आहे. सदर रक्कम अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. सरकापक्षातर्फे सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. अर्जदार यांनी किती तारखेला, कोणती लिंक होती याबाबत अर्जामध्ये मजकूर नमूद असणे आवश्यक आहे. तसेच त्यावेळी अर्जदाराचे खातेवर नमूद रक्कम होती किंवा कसे याबाबत सायबर तपासी अंमलदार यांचे म्हणणे घेणे गरजेचे आहे.

तसेच त्याप्रमाणे रु.१,२२०००/– यापैकी रु.४८,२३८.७४/– इतकी रक्कम गोठविलेली आहे. ती रक्कम कोणाची गोठविली व अर्जदाराने बॅक ऑफ महाराष्ट्र मधून त्यांची रक्कम गेलेबाबत नमूद आहे परंतु गोठविलेली रक्कम ही वेगवेगळ्या बॅका व रक्कमा आहेत. परंतु नाव नाही तरी ज्या त्या नमूद बॅकेचे संबंधीत अधिका–यांचे म्हणणे घेऊन योग्य तो आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

४. तपासी अधिकारी यांनी लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार यांची फसवणुकीतील रक्कम विविध बॅक खात्यामध्ये स्लीप्ट होवून पुढे व वळत्या झालेल्या असून विविध लाभार्थी बॅक अकाऊंट मध्ये वळती झाल्याचे निष्पण्ण झालेले आहे. अर्जदार यांना सदर गोठविण्यात आलेल्या रक्कमा योग्य त्या अटी व शर्तीवर परत देण्याची त्यांची काही एक हरकत नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जासोबत अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदाराच्या कथनावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांनी सायबर क्राईम पोर्टलवर त्यांच्यासोबत आर्थिक गैरव्यवहार झालेबाबतची तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रार अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, सदर तक्रारीच्या अनुशंगाने अर्जदार यांच्याकडून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टलमध्ये मनी ट्रेल असुन त्यामध्ये पोर्टलमधील संबंधीत नोडल अधिकारी यांनी अर्जदार यांचे व्यवहाराबाबत रक्कम ही होल्ड करुन ठेवलेली आहे. सदर रक्कम ही अर्जदार यांची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम अर्जदारास योग्य अटी व शर्तीवर देणे आवश्यक आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे, कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे व्यवहारातील अर्जदाराच्या खात्यावर होल्ड करुन ठेवलेली रक्कम रु.४८,२३८.७४/– ही अर्जदार यांना बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा– अडकुर, ता. चंदगड, जि. कोल्हापूर यांचे बचत खाते नं.६०१५४१४६३६७ या खात्यावर जमा करणेबाबत संबंधीत बॅकेस कळवावे.

३) अर्जदार यांनी रक्कम रुपये १०,०००/– चा सुपूर्तनामा हमीपत्र/ indemnity bond लिहून द्यावा.

४) अर्जदार यांस असे आदेशीत करण्यात येते की, आदेश क्र.२ मध्ये नमुद बॅंकखाते अर्जदाराच्या नावाने असल्याबाबतचे दस्ताऐवजाची छायांकित प्रत हमीपत्रासोबत दाखल करावी.

**(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत करण्यात आला)**

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.07.03 17:06:29 +0530

**दिनांक : ०3/०७/२०२६** **( ए. एन. सरक )**
**चंदगड.** **प्रभारी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.१),**
**चंदगड.**